**Ashoka Buildcon Limited**

August 13, 2025

To
The Manager
The Department of Corporate Services
BSE Limited
Floor 25, P. J. Towers,
Dalal Street, Mumbai – 400 001

To
The Manager
The Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051

**Scrip Code: 533271**
**Debt CP Code: 728882 / 729123/729743; and**
**Debt NCD Code: 976190 / 976191 / 976192**

**Scrip Symbol: ASHOKA EQ.**

**Sub: Newspaper Publication of unaudited financial results of the Company for the quarter ended June 30, 2025**

We herewith enclose copies of newspaper advertisement regarding unaudited standalone and consolidated financial results of the Company for the quarter ended June 30, 2025, published in 'Free Press Journal' and 'Deshdoot' (Vernacular–Marathi) dated August 13, 2025.

This Disclosure is made in terms of requirements of Regulation 30 and 47(3) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The above information is also available on the website of the Company www.ashokabuildcon.com.

Kindly take the matter on your record.

Thanking you,

Yours faithfully,
For **Ashoka Buildcon Limited**
Manoj Achyut Kulkarni
Digitally signed by Manoj Achyut Kulkarni
Date: 2025.08.13 13:19:13 +05'30'

**(Manoj A. Kulkarni)**
Company Secretary
ICSI Membership No. FCS-7377

**Encl.: As above**

## थोडक्यात

### हुतात्मा स्मारकात उद्या रात्री ध्वजारोहण

**सिन्नर ।** राष्ट्रसेवा दलाच्यावतीने दरवर्षी प्रमाणे गुरुवारी (दि.१४) मध्यरात्री १२.०१ मिनिटांनी हुतात्मा स्मारकात ध्वजारोहण करण्यात येणार आहे. कार्यकर्त्यांनी जेवणाचा डबा घेऊन रात्री ९ वाजता हुतात्मा स्मारकात जमावे, असे आवाहन सागर गुजर, अॅड. शिवाजीराव देशमुख, किशोर जाधव, अजय शिंदे, दत्ता वायचळे यांनी केले आहे.

### सेस लाभार्थी निवड

**सिन्नर ।** जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ५० टक्के किमतीत कृषी निविष्ठा, ट्रॅक्टर व ट्रॅक्टर चलीत रोटाव्हेटरच्या लाभार्थी निवडीसाठी येथील पंचायत समितीत आज (दि.१३) दुपारी १ वाजता लॉटरी काढण्यात येणार आहे. यासाठी लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी करण्यात आली असून पात्र यादी तयार करण्यात आली आहे. त्यांच्यामधून लॉटरी काढण्यात येणार आहे. यावेळी लाभार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गटविकास अधिकारी अशोक भवारी यांनी केली आहे.

### शैक्षणिक साहित्य वाटप

**दिंडोरी ।** आदिवासी दिनानिमित्त संस्कृती संवर्धन महोत्सव समितीच्या वतीने मातेरेवाडी येथील शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स वाटप, गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. याप्रसंगी विक्रम पवार, विक्रांत सूर्यवंशी, विजय कोकाटे, अंकुश गांगुर्डे, तुषार रेहरे, विजय रोकडे, अजय रोकडे, अजय गांगुर्डे, दत्तू शार्दुल, नवनाथ पवार, घनश्याम काळे, संकेत पिठे, राहुल गवारे, बापू सोनवणे आदी उपस्थित होते.

### डॉ. रंगनाथन जयंती

**वांगणसुळे ।** सुरगाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.विजय अहिरे, ग्रंथपाल संजय महाजन, डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा. सुरेश भोये, प्रा.बाळू धुम, प्रा. कविता भोये, प्रा. भगवान महाले, प्रा. कृष्णा गांगोडे, प्रा. सुशील पवार, प्रा. सुभाष कामडी, ओमकार धुम, हेमंत चौधरी, सागर डोंगरे आदी उपस्थित होते.

### शेतकरी कार्यशाळा

**पेठ।** शेतकऱ्याचे उत्पन्न वाढावे, या साठी कृषी विभागाच्या नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पच्या माध्यमातून व तालुका कृषी अधिकारी प्रशांत राहणे यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ येथे कार्यशाळेचे आयोजन कारण्यात आले होते. भात पिकाचे खत व्यवस्थापन कीड व रोगांची यांची ओळख करण्यात आली. यावेळी सांघिक खेळ घेण्यात आले. कृषी सहाय्यक अधिकारी सुभाष भोये यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

### साहित्य वाटप

**अलंगुण ।** करंजुळ, करंजाळी यासह वीस दुर्गम जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या,पेन, पेन्सिल, कंपास पेटी, दप्तर यासारखे उपयुक्त साहित्य देण्यात आले. यावेळी सुधाकर, भोये, दिलीप राठोड, रणजित गावित, मुख्याध्यापक रतन पाटील, मुरलीधर चौधरी, शुभान महाले, भाग्यश्री चौधरी आदींसह शिक्षकवृंद उपस्थित होते.

### गणपती कार्यशाळा

**सिन्नर ।** येथील कन्या विद्यालयात शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थान अॅड. श्रीराम क्षत्रिय होते. प्रमुख पाहुणे म्हणून पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष गोरक्षनाथ सोनवणे होते. सोनाली मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुकुटाच्या नक्षीपासून गळ्यातील वक्रतेपर्यंत प्रत्येक सूक्ष्म तपशीलात त्यांनी कलात्मकतेची जाण विद्यार्थिनींच्या मनात रुजवली. सोनवणे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परंपरा, कला आणि पर्यावरण संवर्धनाचा त्रिवेणी संगम या कार्यशाळेत साधला जात असल्याचे अॅड. क्षत्रिय म्हणाले. नीलिमा दुसाने यांनी सूत्रसंचलन केले. दीपक गायकवाड, प्रतिभा वाढवणे यांनी कार्यशाळेसाठी परिश्रम घेतले.

# ऊस बिलाची उर्वरित रक्कम द्या : बर्डे

**म्हेळूस्के । वार्ताहर**



येत्या काही दिवसांत कादवा कारखान्याचा ऊस गाळप हंगाम चालू होण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून देखील अद्यापही मागील ऊस बिलाची एफआरपी नुसार उर्वरित रक्कम कादवाने अदा केली नसल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. ऊस बिलाची रक्कम त्वरित ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खाती वर्ग करावी. अन्यथा कादवा कारखाना कार्यस्थळावर ऊस उत्पादक शेतकरी तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा ऊस उत्पादक सभासद सचिन बर्डे यांनी दिला आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार ऊसाची एफआरपी एकरक्कमी देणे बंधनकारक असतांना गेल्या काही वर्षापासून कादवा सहकारी साखर कारखाना सातत्याने ऊस बिल दोन ते तीन हप्त्यात अदा करत आहे. याहीवर्षी कादवाने जाहीर केलेल्या ३००० रुपये एफआरपी पैकी २८०० रुपये रक्कम दोन हप्त्यात अदा केली आहे.

ऊस हेच एकमेव शाश्वत पीक शेतकऱ्यासाठी संजीवनी ठरतं आहे. अजूनपर्यंत उसाची एफआरपीची संपूर्ण रक्कम ऊस उत्पादकांना मिळत नसेल तर हा कादवा व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभाराचा पुरावा असल्याची संतप्त प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. देशभरातील साखर उद्योग प्रचंड अडचणीत असल्याची बाब मान्य करत कारखान्याच्या हितासाठी ऊस उत्पादक शेतकरी दोन पाऊले मागे येऊन एफआरपीची रक्कम दोन-तीन हप्त्यात घ्यायलाही तयार होते. बी-बियाणे, खते, औषधे, बँकांची देणी, मुलांचे शिक्षण, कौटुंबिक गरजा कशा भागवणार? याकडेही बर्डे यांनी लक्ष वेधले आहे. कादवा व्यवस्थापनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर ठेऊन उर्वरित बिलाची रक्कम त्वरित बँक खाती वर्ग करावी असे सचिन बर्डे यांनी म्हटले आहे.


## मालेगाव महानगरपालिका, मालेगाव
## विद्युत विभाग

**जाहिर (प्रथम वेळ) ई-निविदा सुचना क्र. ०२/२०२५-२६**

मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांचे मार्फत विद्युत विभागा कडील मनपा निधी अंतर्गत मालेगाव शहरात पथदीप वयवस्थेकरिता टाइमर पॅनल पुरविणे व बसविणे या कामासाठी जाहिर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा सुचना ही महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर दर ई-निविदा सुचनेत कामासंबंधीची संपुर्ण माहिती विद्युत विभागात उपलब्ध असून, सदर कामासंबंधी सर्व अटी/शर्ती निविदा फॉर्म सोबत आहेत. तसेच सदर कामासाठी आवश्यक माहिती विद्युत अधिक्षक, मालेगाव महानगरपालिका यांचे कार्यालयाकडून प्राप्त करता येईल. दिनांक : १२/०८/२०२५ ते २०/०८/२०२५

जा.क्र./मामनपा/विद्युत विभाग/३२०/२०२५
दिनांक : ११/०८/२०२५

सही/-
**आयुक्त तथा प्रशासक**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**



## नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक ४२२००२
**कार्यशाळा व्यवस्थापन विभाग**

**ई-निविदा सुचना क्र. ६/१, (सन २०२५-२६) (प्रथम मुदतवाढ)**

**कामाचे नाव :-** मनपाकडील मारुती सुझुकी इंडिया लि. मेक वाहनांच्या दुरुस्तीसाठी स्पेअरपार्टचा पुरवठा करणे व आवश्यक दुरुस्ती कामे करणे कामी दरकरार करणे (एक वर्षाकरिता)

**प्राकलन र.रू. :- १०,००,०००/-**

सदर कामासाठी ई-निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निवदेच्या ऑनलाईन निविदा विक्री व स्विकृतीस दि.१८/०८/२०२५ रोजी दु.१५.०० वाजेपावेतो प्रथम मुदतवाढ देणेत येत आहे. सदरची निविदा शक्य झाल्यास दि.१९/०८/२०२५ रोजी सायं.१७.०० वाजता उघडणेत येईल.

इच्छुक निविदाधारकांनी सविस्तर माहितीसाठी **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

जनसंपर्क/जा.क्र./२११/२०२५
दि. १२/०८/२०२५

सही/-
**अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

झाडे लावा, झाडे जगवा



## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशनसाठी)

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यांत येते की,

**मिळकतीचे वर्णन - नाशिक शहर-३,** ता. जि. नाशिक येथील नाशिक महानगरपालिका हद्दीतील स्थावर मिळकत यांसी **भूमापन क्रमांक व उपविभाग : ६४९/अ/१/१क/अ/प्लॉट/११अ** या प्लॉट मिळकतीवर **'युनायटेड हाऊस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.. नाशिक** या नावाने असलेल्या इमारतीतील तळ मजल्यावरील ऑफिस जागा यांसी **बिल्टअप क्षेत्र १३०.२४ चौ.मी.** या ऑफिस जागेस चतु:सीमा मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे. येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक बांधीव जागा तदंगभूत वस्तूंसह स्वतंत्र इले. कनेक्शन यासह सर्व सामाईक सुविधांचा उपभोग घेणेचे हक्कांसह मिळकत दरोबस्त.

वर नमूद बांधीव ऑफिस जागा **मे. युनायटेड डेव्हलपर्स भागीदारी फर्म** यांचे मालकीची आहे. सदर ऑफिस जागा संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे मालकांचे म्हणणे आहे. सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनचे काम आमचेवर सोपविले आहे. त्याचा एक भाग म्हणून प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, तारण, बक्षीस, करार मदार, मुखत्यारपत्र अगर अन्य कुठलाही बोजा असल्यास त्या बोजाधारकाने कागदपत्रांसह लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांत घेवून त्यांचे बोजाविषयी खात्री करून द्यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजले जाईल. मुदतीनंतर व कागदपत्रांशिवाय घेतलेली हरकत तसेच परस्पर वर्तमान पत्रांत प्रसिध्द होणारी हरकत विचारात घेतली जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक दिनांक १२/८/२०२५.

सही/- **एस. एल. देशपांडे,** अॅडव्होकेट
२/३, बळवंत चेंबर्स, शरणपूररोड, नाशिक.



## जाहीर नोटीस

प्रोसेस जमा — अॅड. आर. डी. देशमुख,
श्री. एस. एच. खाडे साहेब, नाशिक — निशाणी क्र. - ०७
१५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, नाशिक
( भारतीय वारस हक्क कायदा कलम ३७२ प्रमाणे)
दिवाणी चौकशी अर्ज क्र २३४/२०२५
नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब. व. स्तर, नाशिक यांचे न्यायालयात
श्री. सुधाकर जगन्नाथ डहाळे — अर्जदार
रा. ४, शिवांजली रोहाऊस को-ऑप. हौ. सोसा.
वृंदावननगर, कामटवाडे, नाशिक
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाले

ज्या अर्थी उपरोक्त दिवाणी किरकोळ अर्ज भारतीय वारसहक्क कायद्याचे कलम ३७२ अन्वये अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, त्यांची आई कै. श्रीमती पार्वताबाई भ्र. जगन्नाथ डहाळे यांचे नावे कर्मचारी भविष्य निधी संघटन क्षेत्रिय कार्यालय भविष्य निधी भवन, एम. आय. डी.सी. सातपूर, नाशिक यांचेकडील पी.पी.ओ. नं. ९३७८ या खात्यातील भांडवल परतावा रक्कम रूपये ५३०००/- अक्षरी त्रेपन्न हजार मात्र शिल्लक आहे. सदरील पी.पी.ओ. खाते अर्जदाराचे वडील नामे जगन्नाथ महादू डहाळे यांचे नावे होते त्यांचा मृत्यू दिनांक ४.१.२०२० रोजी वरील नमूद राहत्या ठिकाणी नाशिक येथे झाला व त्यांचे निधनानंतर सदरील खात्यास आई नॉमिनी होती. मात्र तिचे दिनांक ३०.०८.२०२४ रोजी निधन वरील नमूद राहती ठिकाणी नाशिक येथे झाल्याने तिचे पश्चात वारस या नात्याने अर्जदारास सदरील रक्कम मिळणेचा कायदेशीर हक्क प्राप्त असल्याने सदरील रक्कम व त्यावरील व्याज मिळणेसाठी अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकामी सदरील अर्जात विनंती केलेली आहे. सदरील दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३४/२०२५ या प्रकरणात पुढील तारीख १९/०९/२०२५ अशी नेमलेली आहे. अर्जदाराने केलेल्या मागणीप्रमाणे सदरील रक्कम मिळणेकामी त्यास मे. न्यायालयाचे आदेशाने वारस दाखला मिळणेबाबत कोणाचीही हरकत असल्यास हरकतदाराने सदरील प्रकरणात उपरोक्त तारखेस मे. न्यायालयात प्रकरणी सकाळी १०.३० वाजता समक्ष हजर राहून पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. नमूद तारखेस हरकत न नोंदविल्यास मे. न्यायालय योग्य ते आदेश पारित करतील बाबत नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी व आमचे सहीने प्रसिध्द केली असे.

सही/- क. लिपिक — कोर्टाचा शिक्का — सही/- अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, नाशिक



## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका निफाड, **मौजे ओझर टाऊनशिप** शिवारातील **गट नंबर २६३९/४/१ यांसी जिरायत क्षेत्र १ हे. ५०.०० आर. चौ.मी. यांसी आकार रुपये ४.६३ पैसे** यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | गट नं. २६३९/५ व २६३९/१० |
| पश्चिमेस | : | गट नं. २६३९/४/२ |
| दक्षिणेस | : | गट नं. २६३९/३ |
| उत्तरेस | : | गट नं. २६३९/९ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत ही **श्री. अरुण मुरलीधर दीक्षित** यांचे कब्जेवहिवाटीत व उपभोगात मालकी हक्काने आहे. सदरच्या प्राप्त हक्क व अधिकारात **श्री. अरुण मुरलीधर दीक्षित** यांनी वर नमूद मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट मागितले आहे.

सदरची मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे त्यांनी खात्रीपूर्वक सांगितले आहेत. तत्राप सदर मिळकतीवर कोणाचा गहाण, दान, लीन, लीज, बक्षीसपत्र, अन्नवस्त्र, जप्ती जामीनकी, कोर्टवाद, लेखी, तोंडी करारमदार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसांचे आत** आमचे खालील पत्यावर लेखी हरकती साक्षांकित कागदपत्रांनिशी नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे, टायटल क्लिअर आहे असे समजून टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस. दिनांक :- १२/०८/२०२५

सही/- **श्री. कांतीलाल मोतीलाल तातेड,** अॅडव्होकेट, **सौ. विद्युल्लता कांतीलाल तातेड,** अॅडव्होकेट
**सौ. पल्लवी किरण कटारिया,** अॅडव्होकेट, **सौ. तेजस्विनी मितेश लुंकड,** अॅडव्होकेट
**ऑफीस नंबर ९०७, बिझनेस सेंटर, गोविंदनगर रोड, नाशिक-४२२००९.**
**मोबाईल नंबर ९८२३१३३१२१**



नामको बँक (मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक) — Namco Bank (Multi-State Scheduled Bank)

## दि नासिक मर्चंटस् को-ऑप. बँक लि., नाशिक
**(मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)**

**प्रशासकीय कार्यालय :** ए-१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबूभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक-४२२००७. फोन : २३०८२०१ ते २३०८२०६, फॅक्स नं. (०२५३) २३५३५८१
Email : ceo@namcobank.in Website : www.namcobank.in

## गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांना या गहाण घ्यावयाच्या मिळकती संबंधाने जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी मौजे कसबे वणी या गावचे ग्रामपंचायत हद्दीतील बिनशेती गट नं. ३२० यांसी प्लॉट नं. १४/१५ यांसी क्षेत्र ३६१.२५ चौ. मी. या प्लॉट मिळकतीवर बांधण्यात आलेल्या कांचन रो-हाऊसेस या स्कीममधील बांधीव रो-हाऊस नं. ३ यांसी तळजागेचे क्षेत्र ५६.९५ चौ. मी. यांसी एकूण बिल्टअप क्षेत्र १०५.२४ चौ. मी. म्हणजेच ११३२.४६ चौ. फूट ही रहिवासी मिळकत मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे यांसी चतु:सीमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे.

२) **मिळकतीचे मालक व कर्जदार :** सौ. शितल सुनील लहांगे, रा. कसबे वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

३) **कर्जाचा प्रकार :-** गृहकर्ज

४) **बँकेचे नाव :-** दि नासिक मर्चंटस् को-ऑप. बँक लि., नाशिक (मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक) शाखा वणी

५) **नोटिसीचा उद्देश :-** टायटल व्हेरिफिकेशन

६) वर कलम ३ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी दि नासिक मर्चंटस् को-ऑप. बँक लि., नाशिक (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक), शाखा वणी यांचेकडे वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी केली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ मधील वर्णन केलेली मिळकत कर्जदार यांनी बँकेकडे गहाण देण्याचे मान्य व कबूल केले आहे.

७) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या टायटलबाबत अगर मिळकत मालक, कर्जदार यांचे मिळकतीबाबत होमफर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लि. याव्यतिरिक्त कोणाची, कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत कोणाकडे गहाण, दान, लिज, सबलिज, बक्षीसपत्र, मुखत्यारपत्र, करार इत्यादी कारणांनी बोजा असल्यास अगर कोणाचा काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे कार्यालयात तसेच बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात आणि शाखा वणी यांचेकडे योग्य त्या लेखी पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध समजून कर्ज देणेकामी तारण/गहाण घेतली जाईल. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. नोटीस हरकत मुदतीनंतर कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. दिनांक : १२/०८/२०२५

सही /- **मा. व्यवस्थापक, दस्त विभाग,**
दि नासिक मर्चंट को-ऑप. बँक लि., नाशिक.
(मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक) करिता

सही /- **अॅड. निलेश सानप,** अॅडव्होकेट व नोटरी
चेंबर नंबर ५१२/३,
जिल्हा न्यायालय आवार, नाशिक.



बँक ऑफ बड़ौदा Bank of Baroda
त्रिमुर्ती चौक शाखा,
शॉप नं.२-६, ज्ञानगंगा अपार्टमेंट, त्रिमुर्ती चौक,
अंबड लिंक रोड, नाशिक-४२२००८

## स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना
**"APPENDIX- IV-A [See provision to Rule 6 (2) & 8 (6)]**

**सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२,**
**नुसार अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. (यापुढे अधिनियम म्हणून संदर्भित)**

सिक्युरिटी इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) रूल्स,२००२ चे नियम ६(२) व ८(६) सह वाचले जाणारे सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२, नुसार अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

तमाम जनतेस आणि विशेषतः कर्जदार व जामिनदार यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, सिक्युअर्ड क्रेडिटर यांचेकडे खालील नमुद मालमत्ता ज्याचा **प्रत्यक्ष ताबा** बँक ऑफ बडौदा सिक्युअर्ड क्रेडिटरचे अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे. सदरील मालमत्ता खाली दिल्यानुसार '**जशी आहे तशी**' '**जी काय आहे ती**' आणि '**जी काय तेथे आहे ती**' या तत्त्वावर खालीलप्रमाणे व्याजासह वसुलीसाठी **विक्रीस काढलेली** आहे. मालमत्तेचा तपशील, सिक्युअर्ड मालमत्ता, थकबाकी, राखीव किंमत, ई-लिलावाची दिनांक व वेळ, अनामत ठेव रक्कम, बोलीत वाढ करण्याचा टप्पा खालीलप्रमाणे आहे.

| कर्जदार/जामीनदाराचे नाव व पत्ता | स्थावर मालमत्तेचे थोडक्यात वर्णन जड जोखिम, बोजा सहित | एकुण देय | राखीव किंमत / अनामत रक्कम / बोलीत वाढ करण्याचा टप्पा | ताबा घेण्याचा स्थिती (प्रतिकात्मक /प्रत्यक्ष) |
|---|---|---|---|---|
| कर्जदारः **सौ. मयुरी रमेश चरवंदे** **पत्ताः** फ्लॅट नं.२७, अग्रसेन टॉवर, हरिबाई अग्रवाल स्कुलजवळ, पंचवटी, नाशिक-४२२००३. | बेअरींग फ्लॅट नं. ३७, क्षेत्र मोजमापीत ८१.७८ स्के.मी. बिल्टअप स्टील्ट दुसरा मजला ''शुभम पार्क बिल्डींग नं. ५'' म्हणून ओळखली जाणारी, प्लॉट नं. १ क्षेत्र मोजमापीत १९६११.६० स्के. मी. मधील सर्व्हे नं. २९६/३, गांव. अंबड खुर्द, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या हद्दीत, मालमत्तेचे सर्व भाग व पार्सल. **मालक :** सौ. मयुरी रमेश चरवंदे. **चतु:सिमाः पुर्वेस-** कॉलनी रोड, **पश्चिमेस-** जीना, ओपन डक्ट, **उत्तरेस-** ६० फुटी रोड, **दक्षिणेस-** फ्लॅट नं. ३८ | रू. 30,71,823.91 (रुपये तीस लाख ऐकाहत्तर हजार आठशे तेवीस व पैसे ऐक्यान्नव फक्त)+ १६.०१.२०२५ पासुनचे व्याज, इतर शुल्क, वजा काही वसुली असल्यास | राखीव किंमत: Rs. 22,10,000/- अनामत रक्कम: Rs. 2,21,000/- बोलीत वाढ करण्याचा टप्पा: Rs.5,000/- | प्रत्यक्ष ताबा |

**ई-लिलावाचा दिनांक व वेळः 15/09/2025 व दुपारी 2.00 ते सायं.6.00 वा. । मालमत्ता पाहणी दिनांकः 14/08/2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 4 पर्यंत**

विक्रीसाठीच्या सविस्तर अटी व शर्तीसाठी कृपया **https://www.bankofbaroda.in/e-auction.htm** लिंकचा वापर करावा आणि ऑनलाईन लिलाव पोर्टल **https://baanknet.in** तसेच संभाव्य निविदाकार अधिकृत अधिकारी यांच्याशी **मोबाईल 9924290330** वर संपर्क करू शकतात.

**दिनांकः ०७/०८/२०२५ । ठिकाणः नाशिक** (टिप : स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

सही/- अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडौदा



महाराष्ट्रशासन
## आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण
## ई- निविदा सूचना क्रमांक ०८ सन २०२५-२०२६ (अल्पकालावधी)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता आदिवासी सा. बां. विभाग कळवण-नाशिक रोड, मानूर, कळवण, ता. कळवण, जि.नाशिक (दूरध्वनी क्रमांक ०२५९२- २२१०५६/२२२२१५ हे खालील कामांच्या ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत / अनोंदणीकृत तसेच निविदेतील अटी शर्ती पूर्ण करतील असे ठेकेदारांकडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता आदिवासी सा. बां. विभाग कळवण यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

निविदा सूचनेत एकूण (०१) एक काम रुपये १०००.०० लक्ष आतील समाविष्ट असून या निविदा सूचनेची संपूर्ण माहिती (तपशील) खालीलप्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

१) www.mahapwd.com २)https://mahatenders.gov.in

| | | | |
|---|---|---|---|
| कोऱ्या निविदा विक्री व बीड सबमिशन दिनांक व वेळ | १३/०८/२०२५ ११:०० पासून | ते | २०/०८/२०२५ १७:०० पर्यंत |

**टीप**
१. ई निविदेची किंमत (ना परतावा) व इसारा / बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारली जाईल.
२ सर्व पात्र / इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या वेबसाईट https://mahatenders.gov.in या पोर्टल एनरोल करणे आवश्यक आहे.
३ वरील कामांना Post Qualification Crieteria अंतर्भुत करण्यात आलेला आहे.
सर्व नोंदणीकृत / अनोंदणीकृत सक्षम कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

**(उमेश गो. पाटील)**
**कार्यकारी अभियंता,**
**आदिवासी सा.बां. विभाग कळवण**

आरओसी-२०२५-२६/क्र.५/सी२०८४



ASHOKA — **Ashoka Buildcon Limited**

**CIN: L45200MH1993PLC071970**
**Registered Office : S. No. 861, Ashoka House, Ashoka Marg, Vadala, Nashik- 422011**
**Tel.: 0253-6633705, Fax: 0253-2236704;**
**Website : www.ashokabuildcon.com; E-mail : investors@ashokabuildcon.com**

**STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2025**

The Board of Directors of the Company at the meeting held on August 11, 2025 approved the standalone and consolidated unaudited financial results of the Company, for the quarter ended June 30, 2025.

The results, along with the Auditor's Report, have been posted on the Company's website at **https://www.ashokabuildcon.com/files/investors/financial-info/ABL_SFS_CFS_300625_BSE_NSE_Outcome_Results.pdf** and can be accessed by scanning the following QR code.

SCAN QR CODE

**For Ashoka Buildcon Limited**

**Date** : August 11, 2025
**Place**: Mumbai

Sd/-
**(Satish D. Parakh)**
**Managing Director**
**DIN-00112324**



## नाशिक महानगरपालिका, नाशिक
सार्वजनिक आरोग्य (मलेरिया) विभाग
## जाहीर आवाहन

**नाशिक महानगरपालिका नाशिक, सार्वजनिक आरोग्य (मलेरिया) विभाग**
**नागरी हिवताप योजने अंतर्गत डेंग्यु / मलेरिया / चिकुनगुणिया रोग जनजागरण मोहिम सन २०२५**

डेंग्यु / चिकुनगुणिया / रोगाचा प्रसार एडीस एजिप्टाय या जातीच्या डासांमार्फत होतो. एडीस डासांची उत्पत्ती सात दिवसापेक्षा जास्त काळ साठवलेल्या घर व घरपरीसरातील स्वच्छ पाण्याच्या साठ्यांमध्ये होते.

१. स्वच्छ साचलेल्या पाण्यामुळे होऊ शकतो. डासांचा प्रादुर्भाव व डेंग्यु / मलेरिया / चिकुनगुणिया आजार.
२. स्वच्छ पाण्याचे सर्व साठे उदा. टाक्या, बॅरल, हौद, रांजन, ओहरहेड टैंक, इ. आठवडयातुन एकदा स्वच्छ करुन घासुन पुसुन कोरडे करावेत.
३. फ्रिज मागिल ट्रे, कुलर, फिशटँक, ओ.सी. डक्ट, लिफ्ट, यामध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. फुलदाणी / चायनीज बांबु / मनिप्लाट / इतर शोभिवंत झाडे मधिल पाणी दिवसाड बदलावे,
५. कुंडी खालील असलेली प्लेट मधिल पाणी काढुन कापडाने कोरडे करावेत.
६. पक्षी व प्राण्याकरीता करीता पिण्याचे पाणवठे दररोज स्वच्छ करुन कोरडे करावेत.
७. पाण्याची टाकी बंदीस्त ठेवावी किंवा त्यांची तोंड कापडाने बांधुन ठेवावीत.
८. रिकामे पिंप भांडी कोरडी राहतील असे ठेवावीत किंवा आवश्यक नसेल तर पालथे करुन ठेवावेत.
९. प्लास्टिकचे ग्लास, प्लास्टिकचे कप, थर्माकॉल प्लेटस, इत्यादी भांडे घरपरीसरात उघडयावर फेकु नये.
१०. टेरेसवर / गच्चीवर / गॅलरीत कोणत्याही प्रकारचे भंगार वस्तु जुने डबे, टायर्स, नारळाच्या करवंटया ठेवु नयेत सदर वस्तुची विल्हेवाट लावावी.
११. नविन व जुने बांधकामात पाणी साठु देऊ नये. तसेच बेसमेंट मधिल पाणी नियमीतपणे काढुन टाकावे.
१२. पावसाचे पाणी परीसरात साचु देऊ नये. पाणी साचल्यास त्यात काळे ऑईल टाकावे.
१३. कारंजा / पडित विहीर / कमळ कुंडी या मधे गप्पी मासे सोडावेत.
१४. घर / बंगला / सोसायटी / शाळा महाविद्यालय कार्यालय / कारखाना / दुकान व इतर सर्व कार्यालयातील भंगार साहित्याची विल्हेवाट लावावी व पन्हाळी मधिल पावसाचे साठलेले पाणी नियमीत काढावे सेप्टीक टँक पुर्णपणे बंदीस्त कराव्यात व व्हेंट पाईपला जाळी बांधावी.

**वरील प्रमाणे काळजी घेतल्यास डेंग्यू, चिकुनगुणिया व मलेरिया या आजारावर निश्चित नियंत्रण करणे शक्य होईल, या आजाराला हद्दपार करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेला सहकार्य करावे. तसेच डास प्रतिबंधात्मक औषध, धुरफवारणी व गप्पीमासे मिळणे करीता खालील प्रमाणे मनपा कायम कर्मचारी व पेस्ट कंट्रोल कंत्राटी कर्मचारी यांची विभागवार नावे व संपर्क खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | कर्मचारी नांव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | ना. पुर्व | श्री. महेंद्र कांबळे (मनपा) | ९१३००४७६२४ |
| | | श्री. नितिन आहिरे (कंत्राटी) | ९१३००४७६११ |
| २ | ना. पश्चिम | श्री. राजेश वाघ (मनपा) | ९९२१८०३४४७ |
| | | श्री. अनिल पाटील (मनपा) | ९४२२२७०३३७ |
| ३ | पंचवटी | श्री. रविंद्र राऊत (मनपा) | ९८३४३९२९९३ |
| | | श्री. रवी गवळी (कंत्राटी) | ९१३००४७६२० |
| ४ | सिडको | श्री. नदिमखान पठाण (मनपा) | ९८२२७४७४७० |
| | | श्री. सचिन रामराजे (कंत्राटी) | ९१३००४७६१८ |
| ५ | सातपुर | श्री. नारायण जाधव (मनपा) | ८६६८८७७६०६ |
| | | श्री. संदिप काळे (कंत्राटी) | ७६२०६०११३२ |
| ६ | ना. रोड | श्री. महेंद्र अरींगळे (मनपा) | ९८५०२०२८२६ |
| | | श्री. संजय पोरजे (कंत्राटी) | ९३७०९०१०८१ |

**नाशिक महानगरपालिका, नाशिक अधिक माहिती करीता संपर्क दुरध्वनी क्र. ०२५३-२२२२५३२**
**सार्वजनिक आरोग्य (मलेरिया) विभाग, मनपा नाशिक व्दारे जनहितार्थ प्रकाशित.**

मनिषा खत्री, (भा.प्र.से.),
आयुक्त तथा प्रशासक,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

करीश्मा नायर, (भा.प्र.से.),
अतिरिक्त आयुक्त (१),
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

डॉ. विजय देवकर,
आरोग्य वैद्यकिय अधिकारी,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

डॉ. योगेश कोशिरे,
जीवशास्त्रज्ञ,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

जनसंपर्क/जा.क्र./१९४/२०२५ दि.०४/०८/२०२५
'' कोरोनाची थांबवा साथ, वारंवार धुवा आपले हात... !''